
# सरंजामीवृतीविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा देणारी कादंबरी 'भिनवाडा'

पूर्वाश्रमीची कसलीही ओळख नसलेल्या एका आदर्श शिक्षकाने फोन करून माझ्याकडे 'भिनवाडा' ही कादंबरी पाठवली.मी मुकागिरीत गेल्या आठवड्यात आर.ए.कुंभार यांनी कर्मवीरांच्या जीवनावर लिहिलेल्या 'ज्ञात अज्ञात कर्मवीर'या पुस्तकाचा परिचय लिहिला,रोहित आवळे यांच्या सापळा कवितासंग्रह यावर लिहिले,आणि तुषार बोकेफोडे यांच्या' चंद्रा' या कादंबरीवर लेखन केले. ही पुस्तके मी कुणीतरी सांगितले म्हणून वाचलेली नाहीत. आणि उगीच डोके फिरले म्हणूनही वाचलेली नाहीत. संविधानाच्या स्वप्नातलं गाव या खूप उशिरा निघालेल्या माझ्या कवितासंग्रहास पुरस्कार मिळाल्यानंतर माझ्या अनेक नवोदित साहित्यिक मित्रांच्या नव्या ओळखी झाल्या मी माझी पुस्तके दिली.त्यांनी त्यांची दिली. दिलेली पुस्तके नुसती कपाटात कोंबून ठेवणे मला आवडत नाही. यात नवीन काय आहे ही जिज्ञासा माझ्या मनात नेहमीप्रमाणे झाली. त्यातून कॉलेजच्या दिवसभराच्या व्यस्त कामकाजात असल्याने रात्री मात्र थोडे जास्त जागून मी या नवनव्या साहित्यिकांच्या कलाकृती मनापासून वाचतोय. या माणसांच्या मनातले प्रश्न,दृष्टीकोन साहित्य रूप कसे घेताहेत,आणि साहित्यात त्यांनी माणसाना काय पद्धतीने आणलेय ही माझी जिज्ञासा आहे. मायणीचे बाळासाहेब कांबळे यांच्या भिनवाडा कादंबरीचे वाचन मी सलग केले. चंद्रा मला दोनदा वाचावी लागली तर कुंभार सरांच्या पुस्तकातील बहुविध बुद्धिमत्ता सिद्धांत मला खूप विचारपूर्वक समजून घ्यावा लागला .ही भिनवाडा कादंबरी मात्र मी एकाच बैठकीत वाचली.या कादंबरीने मला सह्याद्रीची सहल घडवली. तापोळा ,बामोटा ,बामणोली,इथे अनेकदा सहकुटुंब जावे असे मला अनेकदा वाटले पण मला जाता आलेले नाही.या कादंबरीने मला कोयना धरणाच्या आतील क्षेत्रात राहणाऱ्या माणसांची ,संस्कृतींची ,निसर्गाची ,तिथल्या खिंडीची ,वनस्पतींची,तिथल्या पाण्याची ,व्यवसायांची ,मुंबईला कामास गेलेल्या घाटावरल्या कोयना खोऱ्यातल्या माणसांची खूप ओळख करून दिली आहे . मी रयत शिक्षण संस्थेत काम करताना बदल्या झाल्या तरी शहर सदृश्य असलेल्या ग्रामीण भागात फिरणे झाले पण बाळासाहेब कांबळे यांच्या 'भिनवाडा 'या कादंबरीतून मला एक नवेच जग बघायला मिळाले आहे. हे साहित्यातून आलेले जग असलेतरी लेखकाने माणसांच्या प्रवृती बरोबर निसर्गाची विविधता याचे वर्णन अतिशय तृप्त मनाने केलेले आहे. लेखनात प्रांजळपण आहे,सज्जनता आहे. कोणत्याही अहंकाराचा लेखक म्हणून लेखनात स्पर्श नाही. वर्ण्य विषय मनापासून उभा करण्याची तळमळ मात्र खूप आहे.डोंगराच्या सानिध्यात निसर्गानुसार जगणारी ही माणसे त्यांच्या आत्मीयतेचा विषय आहे .मनोगतात त्यांनी दोन शब्द लिहिताना ''सह्याद्रीच्या कुशीत वसलेले महाबळेश्वर हे सातारा जिल्ह्याचे भूषण आहे.विलोभनीय पर्वत शिखरे ,गर्द हिरवी झाडी ,थंडगार हवा ,आणि पावसाळ्यात उंच कड्यावरून फेसाळत वाहणारे धबधबे हे पहायला किती पर्यटक इथे येतात.लाल चुटूक स्ट्रो बेरी ,गोड मध ,हस्त कारागिरीच्या वस्तू हे येथील वैशिष्ट्य आहे असे त्यांनी म्हटले आहे .इथल्या माणसतील आपुलकीने ,मायाळू भाषेने लेखक भारला आहे. आपल्याकडची भाषा उगराट वाटते ,पण त्यांची भाषा खूप आपलेपणाची वाटते हा लेखकाचा प्रत्यक्ष अनुभव आहे .लेखक प्रत्यक्ष ६ वर्षे या परिसरात शिक्षक म्हणून काम करीत होते. ऊन वारा ,पाऊस ,दवापाणी ,कपडालत्ता रोजगार ,यांचा सामना करीत मुरे कडे नदीकाठावर राहणारी माणसे यांचे जगणे त्याने पहिले. या दुर्गम भागात असंख्य साधूनसामना आहे. हे धरण बांधल्याने अनेक घरे ,गावे पाण्याखाली गेली माणसे




पुस्तक परिचय

- प्रा. डॉ. सुभाष वाघमारे
मराठी विभाग प्रमुख,
छ. शिवाजी कॉलेज,
सातारा. ९८९०७२६४४०

मोठ्याप्रमाणावर निर्वासित झाली ,स्थलांतर झाले.ज्या जमिनी त्या पाऊस कमी पडतो त्या प्रदेशात .इथल्या निसर्ग आणि मायभूमी यांच्याप्रेमापोटी हा भाग त्यांनी सोडला नाही.मग त्यांनी दूर डोंगरावर घरे बांधली.पुन्हा तिथेच संसार थाटला.भात शेती ते करतात .जिकडे बघावे तिकडे पाणीच पाणी.उत्पन्नाचे दुसरे साधन नाही.उत्पन्नाचे दुसरे कसलेच साधन नाही .मग महाबळेश्वर येथे हॉटेलात काहीजण काम करतात .तर काही रोजगारासाठी मुंबईला गेलेले.जगण्यात साधेभोळेपणा आहे.इथल्या अज्ञानाचा फायदा घेऊन काही स्वार्थी माणसे आपला स्वार्थ साधून घेतात असे लेखकाला वाटते.दुर्गम जंगल झाडीत राहणाऱ्या माणसांच्याकडे किती दुर्लक्ष झाले आहे आणि इतरांच्या मानाने त्यांचे जीवन व्यावहारिक सुखापासून वंचित कसे आहे हे दाखवण्याचा लेखकाचा जाणीवेने प्रयत्न आहे .सदर कादंबरीत शिवसागर जलाशय परिसरातील जीवन ,डोंगरी पर्वत प्रदेशात राहणाऱ्या लोकांची संस्कृती आपल्याला दिसते.. महाबळेश्वर येथे पाच प्रमुख नद्यांचा उगम होतो.कृष्णा ,कोयना ,वेण्णा ,सावित्री आणि गायत्री या त्या पाच नद्या आहेत.यातील कोयना नादी ही कांदाटी व सोळशी या दोन उप नद्या यांना घेऊन जावली ,व पाटण खोऱ्यात ६०-७० किलोमीटर अशी प्रवास करते. तिच्या दुतर्फा अनेक गावे आहेत. कोयना नदीवर धरण बांधण्यात आले पर्यटनासाठी आलेल्या रसिक जीवाना हा निसर्ग वेडा आणि धुंद करत असला तरी प्रत्यक्ष दुर्गम भागात राहणाऱ्या माणसांची गरिबी कशी आहे हे या कादंबरीने खरेपणाने दाखवले आहे.ही कादंबरी २०२१ च्या ऑक्टोबर महिन्यात लोकायत प्रकाशन सातारा यांनी प्रकाशित केली आहे.मुखपृष्ठ संतोष महामुनी यांनी काढले आहे. भिनवाडा ही कादंबरी ही स्वनुभावर लिहिलेली पहिलीच कादंबरी आहे.यापूर्वी त्यांनी महात्मा फुले आणि रमाबाई आंबेडकर यांचे चरिता लिहिले आहे.आपल्या हृदयातून अखंड प्रेमाचा झरा वाहत ठेवणाऱ्या दुर्गम जावळीच्या कोयना ,कांदाट व सोळशी नदी खोऱ्यातील प्रेमळ माणसाना ही कादंबरी लेखकाने अर्पण केली आहे .

'' भिनवाडा' म्हणजे काय ? असा प्रश्न पडल्यावर लेखकास मला फोन करून संकल्पना आणि तेथील संकृती समजावून घ्यावी लागली .भिनवाडा ,या शब्दाचा अर्थ '' गावाचा भिनवाडाझाला या वाक्याद्वारे समजून घेतला .भिनवाडा म्हणजे अवकळा येणे असा घेता येईल. ''पूर्वी गाव एकोप्याने सुखी होता ,आता मात्र या गावात राजकारण्याने चिंध्या झाल्या ,असे आपण म्हणतो तेंव्हा गाव बिघडून गेले असा शब्द आपण घेतो.चांगले चालेल्या गावाचे राजकारणी लोकांच्यामुळे वाटोळे झाले असे दर्शवण्यासाठी भिनवाडा या शब्दाचा अर्थ वाटोळे होणे ,एकोप्याने गाव विस्कळीत झाले अस दर्शवायचे आहे .

ही कादंबरीचे कथानक असे आहे की माणदेश परिसरातील विश्वास देठे नावाचा युवक प्रथमच शिक्षक म्हणून नोकरीस रुजू होण्यासाठी महाबळेश्वर पासून येळेघिड आणि तिथून ढेनवळे गावी जाण्यासाठी निघतो ..मेढा कुडाच्या घरात आयुष्य गेलेल्या गरिबीतून शिकून शिक्षक झालेल्या विश्वासला दुर्गम भागात नोकरी मिळाली तरी आनंद होतो.पावसाळी वातावरण होते.महाबळेश्वर वरून सौंदरी जाणारी एस.टी बस तो पकडतो ..देवीचा वार आणि बाजारचा दिवस एकच तिथल्या संस्कृतीचे विश्वासला होणारे दर्शन खूप नवे असते .देवीच्या वारी लाकूडफाटा तोडायचा न्हाय हा रिवाज.,तिथली आगळी प्रेमळ भाषा,एस.टीतली गर्दी,उशीर झाल्यामुळे मध्येच झालेला मुक्काम ,तिकडच्या जनावर जीत्राबाची भीती,इकडच्या माणसांना मंगलवेढा इथे मिळालेली सरकारी जमीन ,पुनर्वसन नवीन असलेल्या विश्वासला रात्र झाल्याने गाव सापडणार नाही ,या काळजीने प्रवाशाने दिलेला आसरा ,आणि तुमचे पाय आमच्या दाराला लागले म्हणून असणारी आपुलकी,बोंबील ,नाचणीची भाकरी, पांढरा भात ,लोणचे ,कारल्याची चटणी,असे रात्रीचे जेवण पुन्हा सकाळी जाताना शिंगाडा माशाचे कालवण ,आणि पुन्हा ढेणवळे गावाकडे जाताना सोडायला आलेला म्हातारा हा पहिलाच अनुभव तिथल्या माणसांच्या मायाळूपणाचे दर्शन घडवते. वाटेने जाताना तिथली काही मुले या नवीन चालत निघालेल्या शिक्षकाला सगळी माहिती देतात. बहुतांशी लोक मुंबईला माथाडी कामगार किंवा हमाल म्हणून कामासाठी गेलेले .सभोवताली आहीन .हेला आपट्याच्या सावलीचा आधार घेत तो निघालेला विश्वास अखेर शाळेत पोचतो.परिसरात सगळीकडे लालमाती ,,आणि गर्द झाडीत लपलेली शाळा .१९३४ ला ही शाळा बांधलेली होती.

(उर्वरित भाग उद्याच्या अंकात)